**नि.१२८ च्या पुढे सुरु**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. २ दत्तात्रय बाबुराव सहाणे यांचा उलटपास वादी तर्फे वकील श्री. बी. जी. काळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

४. भिमाबाई भिमाजी सैद ही माझी मावशी आहे व प्रतिवादी क्र.१ ही माझ्या मावशीची नणंद आहे. मी घोडेगावला राहत असल्याने सुट्टीच्या दिवशी माझ्या मावशीच्या घरी गिरवलीला जात होतो. मी प्रतिवादी क्र.१ यांना सन १९७१ - ७२ पासुन ओळखतो. मी प्रतिवादी क्र.१ यांना त्यांच्या लग्नाच्या अगोदरपासुन ओळखतो. मी माझ्या मावशीच्या घरी जात होतो व प्रतिवादी क्र.१ या तिथेच राहत असल्याने माझा व त्यांचा संपर्क झाला. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादी क्र.१ यांचे व्यक्तीगत संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ यांच्या वकीलांना न्यायालयात घेऊन येतो. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या मावशीच्या घरी जात होतो तेव्हा प्रतिवादी क्र.१ यांना भेटत नव्हतो.

प्रश्न : तुम्ही प्रतिवादी क्र.१ च्या आयुष्यामध्ये सहभाग का घेत होते ?
उत्तर : मी प्रतिवादी क्र.१ च्या आयुष्यामध्ये सहभाग घेतला नाही.

५. प्रतिवादी क्र.१ या मुलींना घेऊन आमच्या घरी आल्या होत्या. त्यांनी मुलींना पुणे येथे शाळेमध्ये भरती करायचे आहे असे सांगितल्याने मी त्यांच्यासोबत त्यांच्या मुलींना शाळेत भरती करण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादी क्र.१ यांचे स्नेहाचे संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्यावरुन प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या मुलींना कर्वेनगर, हिंगणे येथील शाळेत भरती केले. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी क्र.१ भेटत होतो. प्रतिवादी क्र.१ यांना कोणही नातेवाईक नाही असे म्हणता येणार नाही. प्रतिवादी क्र.१ यांचा चुलत भाऊ जिवंत आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा प्रतिवादी क्र.१ यांच्या आयुष्यामध्ये संचार असल्यामुळे त्यांचे त्यांच्या पतीसोबत वाद होत होते.

६. माझ्या मावशीने मला सांगितले की, प्रतिवादी क्र.१ ही तिच्या मुलींच्या दाखल्याकरीता पुण्यामध्ये येत आहे, तिच्यासोबत जा म्हणुन मी प्रतिवादी क्र.१ सोबत तिच्या मुलींना शाळेत भरती करण्यासाठी गेलो. हे म्हणणे खरे आहे की, माझे व प्रतिवादी क्र.१ यांचे अधिकृत नाते नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे प्रतिवादी क्र.१ यांच्यासोबत रक्ताचे नाते नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ व त्यांच्या कुटूंबियांच्या कागदपत्रामध्ये माझा नातेवाईक म्हणुन उल्लेख नाही. प्रतिवादी क्र.१ ही माझ्या मावशीची नणंद असल्याने मी तिला ओळखतो.

**मध्यांतर झाल्याने उलटतपास दुस-या सत्रापर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.२३/०४/ २०२६**
**घोडेगाव**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**मध्यांतरानंतर पुढील उलटतपास शपथेवर सुरु.**

७. मी बोपखेल, पिंपरी चिंचवड, केशरी नगर, पुणे ३१ येथे सुध्दा राहतो. मी बोपखेल येथे माझ्या कुटूंबासोबत राहतो. हे म्हणणे खरे आहे की, मी अनेक वर्षापासुन पुण्यामध्ये राहतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, मी शेतीच्या कामानिमित्त गावी येऊन जाऊन करतो.

प्रश्न : प्रतिवादी क्र.१ चे पती जिवंत असताना देखील तुम्ही त्यांच्या मुलींना शाळेत भरती का केले

उत्तर : माझ्या मावशीने मला सांगितले की, प्रतिवादी क्र.१ ही तिच्या मुलींच्या दाखल्याकरीता पुण्यामध्ये येत आहे, तिच्यासोबत जा म्हणुन मी प्रतिवादी क्र.१ सोबत तिच्या मुलींना शाळेत भरती करण्यासाठी गेलो.

८. मंचर येथे हायस्कुल व महाविद्यालय असताना देखील प्रतिवादी क्र.१ च्या मुलींना पुण्यामध्ये शाळेत का भरती केले याचे कारण मला सांगता येणार नाही. मी मुलींच्या शाळेत भरती करण्याच्या कोणत्याही अर्जावर सही केली नाही. मुलींना शाळेत भरती करताना वादी समक्ष नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मुलींना शाळेत भरती करताना प्रतिवादी क्र.१ सोबत मी होतो. प्रतिवादी क्र.१ च्या मुलींच्या लग्नात मी उपस्थित नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या शेताचे उतारे काढणे इ. कामांमध्ये माझा सक्रीय सहभाग आहे. माझे व प्रतिवादी क्र.१ चे कोणतेही नाते नाही. मी प्रतिवादी क्र.१ यांना त्या माझ्या मावशीच्या नणंद आहेत म्हणुन ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादी क्र. १ चे काहीही नाते नसताना मी त्यांच्यासाठी राबत आहे.

९. हे म्हणणे खरे आहे की, मी पुण्यात राहत असल्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने तिच्या मुलींना पुण्याच्या शाळेत भरती केले. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.१ च्या मुलींना हिंगणे येथे भेटायला जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी प्रतिवादी क्र.१ ही तिच्या मुलींना पुण्यात भेटण्यासाठी येत होती तेव्हा मी प्रतिवादी क्र.१ ला भेटायला जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी प्रतिवादी क्र.१ च्या सांगण्यावरुन साक्ष देत आहे.

**वादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.२३/०४/ २०२६**
**घोडेगाव**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

**पुढील उलटपास वादी तर्फे वकील श्री. बी. जी. काळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

१०. हे म्हणणे खरे आहे की, संगिता व शोभा या मुली वादीच्या आहेत. संगिता व शोभा या मुली वादीच्या आहेत किंवा कसे हे तपासण्याकरीता न्यायालयाने डी.एन.ए. चाचणी करण्याचे आदेश दिले होते किंवा कसे हे मला माहिती नाही. अभिलेखावर असलेला डी.एन.ए. चाचणी अहवाल मी वाचलेला नाही.

प्रश्न - अभिलेखावरील डी.एन.ए. चाचणीच्या अहवालात वादी संगिता व शोभा याचे पिता असल्याची शक्तता शुन्य टक्के आहे असे म्हटले आहे त्याबाबत आपल्याला काय सांगायचे आहे ?

उत्तर - वादीच त्या मुलींचा पिता आहे.

११. वादीने ताराबाई या महिलेसोबत दुसरे लग्न केले किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला त्याच्या दोन्ही पत्नीपासुन मुल होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीला मुल होऊ शकत नाही हे डी.एन.ए. चाचणीने सिध्द केले असताना मी प्रतिवादीला चुकीचा फायदा मिळवुन देण्यासाठी चुकीची साक्ष देत आहे.

प्रश्न - तुमच्या मावशीच्या घरापासुन प्रतिवादीचे घर किती अंतरावर आहे ?

उत्तर - प्रतिवादी माझ्या मावशीच्या घरातच राहत होते.

१२. प्रतिवादीला तिचे स्वतःचे वेगळे घर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी जेव्हा माझ्या मावशीच्या घरी जात होतो तेव्हा प्रतिवादीवर २४ तास पाळत ठेवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मावशीच्या घरामध्ये किती लोक येत जात होती हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या कुटूंबापेक्षा प्रतिवादीच्या कुटूंबाची जास्त काळजी घेतो हे न्यायालयाला दाखविण्याचा माझा प्रयत्न आहे.

प्रश्न - डी.एन.ए. चाचणी अहवालाप्रमाणे वादी संगिता व शोभा याचे पिता नाही तरीदेखील तुम्ही वादी त्यांचे पिता आहे हे कशावरुन सांगत आहे ?

उत्तर - मला सदर डी.एन.ए. चाचणी अहवालाबाबत माहिती नाही.

१३. हे म्हणणे खरे नाही की, डी.एन.ए. चाचणी अहवालाप्रमाणे संगिता व शोभा या मुली वादीच्या नसताना देखील मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. मी न्यायालयाची दिशाभुल करत नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.११/०६/२०२६**
**घोडेगाव**